अति. महा. आयुक्त (ज) यांचे कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे-५.
जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/3069
दिनांक :- २९/०८/२०१६

## -: कार्यालयीन आदेश :-

विषय :- श्री. शिवाजी दौंडकर, मुख्य कामगार अधिकारी यांचे अर्जित रजा कालावधीतील कामकाज व्यवस्थेबाबत.

संदर्भ :- १) कामगार कल्याण विभाग यांचा जावक क्र. एलओ/५०१, दिनांक २२/०८/२०१६.
२) मा. महापालिका आयुक्त यांचा ठराव क्र. १/४५३, दिनांक २४/०८/२०१६.

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील मुख्य कामगार अधिकारी या पदावर कार्यरत असलेले श्री. शिवाजी दौंडकर, यांनी संदर्भ क्र. १ अन्वये दिनांक २९ ऑगस्ट २०१६ ते ९ सप्टेंबर २०१६ अखेर १२ दिवसांची हक्काची रजा मिळणेस व त्यांचे रजा कालावधीत मुख्य कामगार अधिकारी या पदाचे कामकाज श्री. नितीन केंजळे, कामगार अधिकारी व संनियंत्रक, सुरक्षा विभाग या पदाचे कामकाज श्री. जयंत भोसेकर, महापालिका सहाय्यक आयुक्त यांचेकडे सोपविण्यात यावा अशी विनंती केली आहे. त्यास मा. महापालिका आयुक्त यांनी संदर्भ क्र. २ अन्वये मान्यता दिली आहे.

श्री. शिवाजी दौंडकर, मुख्य कामगार अधिकारी यांचे रजा कालावधीत मुख्य कामगार अधिकारी या पदाचे कामकाज श्री. नितीन केंजळे, कामगार अधिकारी व संनियंत्रक, सुरक्षा विभाग या पदाचे कामकाज श्री. जयंत भोसेकर, महापालिका सहाय्यक आयुक्त यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

श्री. नितीन केंजळे व श्री. जयंत भोसेकर यांनी अनुक्रमे मुख्य कामगार अधिकारी व संनियंत्रक, सुरक्षा विभाग या पदाचे कामकाज स्वत:च्या पदाचे कामकाज सांभाळून करावयाचे आहे.

श्री. नितीन केंजळे व श्री. जयंत भोसेकर यांनी वरीलप्रमाणे अतिरिक्त पदभार स्विकृत केलेबाबतचे निवेदन आमचे कार्यालयाकडे सादर करावयाचे आहे.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरूर ती पुढील तजविज करावी.

(राजेंद्र जगताप)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका.

प्रत:- **सर्व संबंधित मा.खातेप्रमुख,**
पुणे महानगरपालिका.
यांजकडे माहिती व पुढील तजविजीसाठी रवाना . . . .

(सुहास मापारी)
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका.